लोकमत



कोल्हापुरात शाहू स्मारक भवनात शनिवारी यशवंतराव थोरात यांच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी जयसिंगराव पवार, नाना पाटेकर, शाहू महाराज, यशवंतराव थोरात उपस्थित होते. (छाया : आदित्य वेल्हाळ)

# यशवंतरावांनी देशासाठी दिशादर्शनाचे काम करावे

## शाहू महाराज : पुस्तकाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : अमृतमहोत्सवी वर्षात देशापुढची नवी वाट काय असणार हे शोधण्याची गरज निर्माण झाली आहे. ही नवी वाट शोधण्यासाठी यशवंत थोरात यांनी दिशादर्शन करावे, असे प्रतिपादन शाहू महाराज छत्रपती यांनी शनिवारी केले.

'नाबार्ड'चे माजी अध्यक्ष डॉ. यशवंत थोरात यांच्या 'काही वाटा काही वळण आणि नवी वाट नवे क्षितिज' या पुस्तकांचे प्रकाशन शनिवारी शाहू स्मारक भवनात उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झाले. शाहू छत्रपती महाराज अध्यक्षस्थानी होते. अभिनेता नाना पाटेकर, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. उषा थोरात, अस्मिता कुलकर्णी प्रमुख उपस्थित होते. मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, यशवंतराव यांच्या पुस्तकात अंतर्मुख करणारे मूलभूत चिंतन आहे. अभिनेता नाना पाटेकर यांनी खरं लिहिण्याचा वारसा तुम्हाला आहे, अशा शब्दात कौतुक केले. जयसिंगराव पवार म्हणाले, यशवंतराव हे प्रत्यक्ष शाहू महाराजांच्या विचारांचे फळ आहे. त्यांनी इतिहासाचे भाष्यकार म्हणून काम करावे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचेही भाषण झाले. भगवान दातार यांचा सत्कार झाला. अनिल कुलकर्णी यांनी आभार मानले. शुभदा हिरेमठ यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
26 FEB 2023
पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : डॉ यशवंत थोरात लिखित 'काही वाटा काही वळणे' व 'नवीन वाट नवीन क्षितिजे' या पुस्तकांचे प्रकाशन करताना शाहू महाराज, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील. डावीकडून सौ. उषा थोरात, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी .टी .शिर्के, इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, अभिनेते नाना पाटेकर, डॉ. यशवंत थोरात, अस्मिता कुलकर्णी.

(छाया : अर्जून टाकळकर)

26 FEB 2023
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. थोरात यांची पुस्तके नव्या पिढीला प्रेरणा देणारी

- श्रीमंत शाहू छत्रपती यांचे प्रतिपादन
- नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंत थोरात यांच्या पुस्तकांचे प्रकाशन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

विविधतेतून एकता ही आपल्या देशाची खरी ओळख आहे. आज जागतिकीकरणामुळे स्पर्धेचे युग आले आहे. अशा स्थितीत आपला भारतही नव्या वाटेवरून निघाला आहे. पण ही वाट साधीसुधी नाही, बिकट आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. यशवंत थोरात यांची पुस्तके नव्या पिढीला नक्कीच प्रेरणा देणारी ठरतील, असा विश्वास श्रीमंत शाहू छत्रपती यांनी व्यक्त केला.

डॉ. यशवंत थोरात लिखित 'काही वाटा काही वळणं' आणि 'नवी वाट नवे क्षितिज' या दोन पुस्तकांचा प्रकाशन समारंभ श्रीमंत शाहू छत्रपती यांच्या अध्यक्षतेखाली आणि उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झाला. राजर्षी शाहू स्मारक भवनमध्ये झालेल्या या समारंभाला ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर, इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, कुलगुरू डॉ डी .टी. शिर्के, रिझर्व्ह बँकेच्या निवृत्त डेप्युटी गव्हर्नर डॉ उषा थोरात, सकाळ माध्यम समूहाचे संपादक संचालक श्रीराम पवार, अस्मिता कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षस्थानावरून बोलताना श्रीमंत शाहू छत्रपती यांनी डॉ. थोरात यांच्या पुस्तकांचे कौतुक केले. ते म्हणाले, नव्या वाटेवरून जाणाऱ्या आपल्या देशाला विविध दृष्टीकोनातून विचार करण्याची गरज आहे. विविधतेत एकता हे आपल्या देशाचे वैशिष्ट्य आहे. या सर्व वैशिष्ट्यांचे पदर आपल्या डॉ. थोरातांच्या पुस्तकात अनुभवयास मिळतात. आपल्या देशाच्या वाटचालीत ही पुस्तके नव्या पिढीला प्रेरणा, बळ देतील, अशीच आहेत, असे शाहू छत्रपती म्हणाले.

मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, पुस्तकांच्या प्रत्येक लेखात वेगळे चिंतन आहे. बारा हजार पुस्तके विकत घेण्यासह ती छापण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन मंत्री पाटील यांनी दिले.

अभिनेते नाना पाटेकर म्हणाले, कोणालाही न दुखवता लिहिणे यासाठी कौशल्य लागते, ते कौशल्य डॉ. थोरात यांच्याकडे आहे. हल्ली काही बोलले की लगेच भावनेला धक्का पोहोचतो. परदेशात असताना जात, धर्म नसते. पण भारतात आल्यावर ती आठवते. डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, डॉ. थोरात हे राजर्षी छत्रपती शाहूंच्या विचारांचे पाईक आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी डॉ. थोरात यांची पुस्तके सर्वांना दिशादर्शक असल्याचे सांगितले. सकाळ माध्यम समूहाचे संपादक संचालक श्रीराम पवार म्हणाले, या दोन्ही पुस्तकात कथा, ललित साहित्याच्या छटा, इतिहासाबरोबरच डॉ. थोरात यांचे विविध अनुभवही आहेत. त्यामुळे प्रगल्भ समुपदेशक म्हणून दोन्ही पुस्तके सर्वांनाच मार्गदर्शक आहेत.

लेखक डॉ. यशवंत थोरात म्हणाले, आपण या मातीत जन्मलो म्हणून भारतीय आहोत, हा विचार सर्वांत रुजावा, याच उद्देशाने लेखन केले आहे. सत्य दोन टोकांमध्ये असते हे पुस्तकातून मांडले आहे. अनुबंध प्रकाशनचे अनिल कुलकर्णी, अस्मिता कुलकर्णी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. निवेदन शुभदा हिरेमठ यांनी केले.

यप्रसंगी जिल्हाधिकारी राहुल रेखावार, पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे, महापालिकेच्या प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.